# मुंबईतील तरुणाईची गावकऱ्यांना मदत



शालेय विद्यार्थ्यांना सौरऊर्जा उपकरणाची व दिव्यांची तरुणांनी मदत केली.

**विलेपार्ले :** जोरात बरसणाऱ्या पावसामुळे अवघ्या तरुणाईला वेध लागलेत ते ट्रेकिंग अथवा धबधब्यात चिंब भिजण्याचे. मात्र त्याच वेळी दुसऱ्या बाजूला काही तरुण मंडळी मात्र आजही 'लोडशेडिंग'शी झुंजणाऱ्या खेडेगावांना भेट देऊन त्यांच्या समस्या दूर करण्यावर भर देत आहेत. विलेपार्ले येथील 'द ग्रीन इंडिया इनिशिएटिव्ह' या स्वयंसेवी संस्थेचे तरुण कार्यकर्ते सध्या याच समाजकार्यात व्यस्त आहेत.

नुकतेच या संस्थेने रोटरॅक्ट क्लब ऑफ जय हिंद कॉलेजच्या मदतीने कल्याण येथील शिवाजीनगर, विरार येथील बारामपूर आणि नाशिक येथील तपोवन गावातील अनाथ, गरजू आणि शालेय विद्यार्थ्यांना सौरदिव्यांचे वाटप करुन त्यांना शैक्षणिक मदत केली.

वीकएंड म्हटले की सध्या सर्वांनाच वेध लागतात ते पावसाळी पिकनिकचे. मात्र ही मंडळी सध्या मुंबई परिसरातच नाही तर राज्याच्या इतर दुर्गम भागांचा, ज्या ठिकाणी विजेचा योग्य पुरवठा होत नाही अशा भागांचा अभ्यास करुन गरजू लोकांना सौरऊर्जेच्या माध्यमातून मदत देण्याचा या तरुणाईचा उद्देश आहे. त्यानुसार आता ही मंडळी मुरबाड येथील आदिवासी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा ग्रामीण भागाकडे वळली असून तेथील परिस्थिती पाहून कार्य करणार आहेत. शिवाय आता रोटरी क्लब ऑफ मुंबई, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स आणि रोटरॅक्ट क्लब ऑफ जय हिंद कॉलेज यांच्या मदतीने बदलापूर व मुरबाड येथील गावांना सौरऊर्जेच्या माध्यमाने प्रकाशित करण्याचा 'दी ग्रीन इंडिया इनिशिएटिव्ह' संस्थेचा उद्देश आहे. (प्रतिनिधी)